**नियमीत दिवाणी दावा क्र.२६३/२०२३ मधील निशाणी क्र.१६ वरील आदेश**

( CNR : MHAH2500 0820 2023 )

सदरचा अर्ज प्रतिवादी नं.१ यांनी त्यांचेविरुध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्द होऊन प्रस्तुत अर्जासोबत दिलेली कैफियत अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे. सदर अर्जाचे पुष्ठ्यर्थ प्रतिवादी नं.१ संतोष तबाजी पाचारणे यांनी निशाणी क्र.१७ वर प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे.

२. सदर प्रतिवादीचे असे कथन आहे की, त्यांना कैफियत देण्याकामी लागणारी महत्वाची कागदपत्रे वेळेत उपलब्ध होऊ शकली नाही. त्यामुळे सदर प्रतिवादींना आपले म्हणणे मांडता आले नाही. सदर प्रतिवादी प्रस्तुत अर्जासोबत कैफियत देत आहेत. परंतु त्यांचेविरोधात झालेला विनाकैफियत आदेश रद्द होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. तसे न झाल्यास सदर प्रतिवादींना नैसर्गिक न्यायापासून वंचित रहावे लागणार आहे. सबब, सदर प्रतिवादींनी त्यांचेविरुध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्द होऊन प्रस्तुत अर्जासोबत दिलेली कैफियत दाखल करण्यास परवानगी मागितली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जास म्हणणे देऊन असे कथन केले आहे की, अर्जातील कारण खरे नाही कारण अर्जासोबत प्रतिवादीने कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाहीत. कैफियत उशीरा दाखल केली याबाबत दिलेले कारण खोटे आहे. तसेच किती दिवसांचा उशीर झला हे अर्जामध्ये नमुद नाही. वास्तविक प्रतिवादीस सहा महिन्यांपेक्षा जास्त उशिर झालेला आहे. त्यामुळे अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा.

४. वादी व प्रतिवादी नं.१ यांचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

५. वादीने सदरचा दावा प्रतिवादींच्या विरोधात वाटप, जाहीर ठराव व निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचो अवलोकन करता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ विरुध्द दि.०९.१०.२०२३ रोजी विनाकैफियत आदेश झालेला आहे व प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी दि.११.१२.२०२३ रोजी दाखल केलेला आहे. दाव्यातील कथनाचे अवलोकन करता असे दिसुन येते की, सदर दाव्यामध्ये पक्षकारांचे शेतजमीनींमधील मौल्यवान अधिकार समाविष्ट आहेत. सदर प्रतिवादींनी मुदतीत कैफियत देऊ न शकल्याचे कारण संयुक्तीक वाटते. सदर प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जासोबत कैफियत

दाखल केलेली आहे. सदर प्रतिवादींची कैफियत दाखल करुन न घेतल्यास त्यांचे अतोनात नुकसान होईल. तसेच प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही, उलट दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यास मदत होणार आहे. प्रतिवादींनी मुदतीत कैफियत न दिल्यामुळे वादीस झालेल्या त्रासाबद्दल सदर प्रतिवादींना रक्कम रु.२००/- इतका खर्च वादीस देणे योग्य होईल. सबब, अर्जातील कथनांचा विचार करता नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी नं.१ यांचेविरोधात दि.०९.१०.२०२३ रोजी झालेला विनाकैफियत आदेश त्यांनी रु.२००/- वादीस देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येत आहे.

**( एस. सी. साळवी )**

**दि.०८.०१.२०२४**
**पारनेर**

**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**पारनेर**